# नियमित दिवाणी दावा क्र. २२१/२०२३ मधील नि. ३८ वरील आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००६४६–२०२३)

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, वादीने प्रतिवादीविरुध्द प्रस्तुतचा दावा वाटप, कब्जा, जाहिर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. परंतु, नजरचुकीने दाव्यामधील नमूद वंशावळीमध्ये वादीचे नाव नमूद करण्याचे राहुन गेले आहे. सदरची चुक ही टंकलेखनाची असल्यामुळे वंशावळीमध्ये वादीचे नाव समाविष्ट करणे अत्यंत गरजेचे आहे. सबब, वादीने वर नमूद प्रस्तावित दुरुस्ती करण्याबाबत परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. वादीचे म्हणण्यानुसार प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असून सदर दुरुस्तीने दाव्याचे स्वरुपामध्ये अथवा मागणीमध्ये कोणताही बदल होत नाही. दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्याकरीता सदरची दुरुस्ती आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत अर्ज.

२. प्रतिवादी क्र. १६ यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. सदर प्रतिवादीचे कथनानुसार, अर्ज कायदयाप्रमाणे चालण्यास पात्र नाही. दावा दाखल करताना वादीने योग्य वंशावळ दिलेली नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे प्रतिवादीचे कथन आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवून मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | **...होकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

## का र ण मि मां सा

**वादप्रश्न क्र. १ व २ बाबत –**

**५.** वादपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटप, कब्जा, जाहिर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. दावा कलम ३ मध्ये वंशावळीत दाखवण्यात आलेली सिताबाई ही वादीची आई असल्याचे कथन करण्यात आले आहे. परंतु, दाव्यातील वंशावळीचे अवलोकन करता, सदर वंशावळीत सिताबाई यास वादी हा मुलगा म्हणून वारस असल्याचे दर्शविण्यात आलेले नाही. प्रतिवादी क्र. १६ याचे म्हणणे पाहता, वादी हा सिताबाई हिचा वारस नसल्याबाबतचा वाद प्रतिवादी क्र. १६ तर्फे उपस्थित करण्यात आलेला नाही. अशा परिस्थितीत, प्रस्तुतचा दावा वाटपाचा असल्याने तसेच वादी व प्रतिवादी यांची संपुर्ण वंशावळ दाव्याकामी आवश्यक असल्याने वादी हा सिताबाई हिचा मुलगा असल्याचे ग्राहय धरुन दाव्यातील नमूद वंशावळीमध्ये प्रस्तावित दुरुस्ती होणे आवश्यक आहे. तसेच दाव्याचा गुणदोषावर अंतिम निर्णय होण्याकरीता प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये होणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांचे कोणतेच नुकसान संभवत नसून दावा गुणदोषावर निर्णित होण्याकरीता मदतच होणार आहे. सबब, वाद प्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न क्र. २ करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. नि. ३८ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ३८ येथील अर्जातील विनंतीनुसार वादीने पुढील तारेखस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची प्रत प्रतिवादींना पुरवावी.

श्रीगोंदा.
दिनांक ०४/११/२०२३.

**(ए. एन. कुलकर्णी)**
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.